RIGHT TO INFORMATION

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
म.प./न.प./ज.प.
आवक क्र. 29/2019-20
दिनांक:- 03/05/2019

जा - 5
945
9/5/19
सचिव
जा प्रथम

# सूचना अधिकार अधिनियम 2005

प्रारूप "अ"

प्रतिः **सार्वजनिक सुचना अधिकारी**

सामन्य प्रशासन विभाग

मिरा भायंन्दर महानगर पालिका

भायंन्दर पश्चिम ठाणे

दिंनाक : 12 अप्रैल 2019




**1** आवेदक का पुरा नाम : संतोष कुमार तिवारी

**2** पता : सी 04 न्यु मिरा पैराडाईज को आ सोसायटी

मिरा रोड पुर्व ठाणे - 401107

मोबाईल क्रमाक : **9473734487**

**3 आवश्यक जानकारी का सुचना विवरण सहित प्रदान करायें।**

1 कृप्या हमे मनपा महासभा का ठराव कमांक 34 दिनांक 15 जनवरी 2013 कि प्रति प्रदान करायें।

2 मनपा / सा प्र वि /379/2015 dt 25/5/2015 आपके विभाग से यह आदेश निकाला गया था कृप्या हमे आदेश निकालने से पुर्व से लेकर आदेश पारित होने तक के संपुर्ण प्रकिया कि प्रत प्रदान करायें।

4 जानकारी डाक द्रवारा या प्रत्यक्ष आवश्यक है इसका खुलासा : हमे प्रत्यक्ष या हमारे प्रतिनिधी को प्रदान करे.

स्थान : ठाणे

दिनांक : 12/04/2019

आवेदक का हस्ताक्षर

OK

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./२९ /२०१९-२० दिनांक :- 03/06 /२०१९

प्रति,
**श्री. संतोष कुमार तिवारी,**
**सी ०४, न्यु मिरा पॅराडाईज को.ऑ. सोसायटी,**
**मिरारोड (पूर्व) ४०११०७**

**विषय :-** केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
ठरावाची व आदेशाची प्रत मिळणेबाबत.

**संदर्भ :-** आपणांकडील दि. 12/04/2019 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.
(नगरसचिव कार्यालयास प्राप्त दि. 03/06/2019)

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण मा. महासभा दि. 15/01/2013, ठराव क्र. 34 च्या ठरावाची प्रत व मनपा/सा.प्र.वि./379/2015, दि. 25/05/2015 रोजी अन्वये निर्गमित आदेशाच्या प्रतीची मागणी केलेली आहे.

सदर पत्रातील मुद्दा क्र.1 नगरसचिव विभागाशी निगडीत असुन, मुद्दा क्र. 2 सामान्य प्रशासन विभागाशी निगडीत असल्याने, उक्त मुद्याची माहिती आपणांस मुदतीत परस्पर उपलब्ध करुन देणेसाठी आपणांकडील संदर्भित अर्जाची छायांकित प्रत या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./21/2019-20, दि. 03/06/2019 अन्वये जनमाहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचकडे वर्ग करण्यांत आली आहे. संदर्भास्तव पोच पत्राची छायांकित प्रत सोबत जोडून देत आहोत.

नगरसचिव विभागाशी निगडीत मुद्दा क्र. 1 अन्वये आपणांस मा. महासभा दि. 15/01/2013, ठराव क्र. 34 च्या ठरावाची सत्यप्रत सोबत जोडून देत आहोत. तसेच सदर ठरावाची सत्यप्रत आपणांस यापूर्वी या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./17/2019-20, दि. 22/04/2019 अन्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

Received 10/6/19

03/6/19

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

01

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ 27 /२०१९-२० दिनांक :- 03 /06 /२०१९

**प्रति,**
**जनमाहिती अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**ठरावाची व आदेशाची प्रत मिळणेबाबत.**
**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 12/04/2019 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज. (नगरसचिव कार्यालयास प्राप्त दि. 03/06/2019)**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये अर्जदार श्री. संतोष कुमार तिवारी यांनी मा. महासभा दि. 15/01/2013, ठराव क्र. 34 च्या ठरावाची प्रत व मनपा/सा.प्र.वि./379/2015, दि. 25/05/2015 रोजी निर्गमित आदेशाच्या प्रतीची मागणी केलेली आहे.

संदर्भित पत्राचे अवलोकन केले असता, सदर पत्रातील मुद्दा क्र.2 आपल्या विभागाशी निगडीत असल्याचे दिसून येत आहे. करिता संदर्भित अर्जाची छायांकित प्रत आपणांकडे वर्ग करण्यांत येत आहे. तरी कृपया अर्जदारांस अपेक्षीत माहिती आपणांमार्फत मुदतीत देण्यात यावी हि विनंती.

कळावे.

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

**प्रत :-**

**श्री.** संतोष कुमार तिवारी,
**सी ०४, न्यु मिरा पॅराडाईज को.ऑ. सोसायटी,**
**मिरारोड (पूर्व) ४०११०७**

लिपीक
सामान्य प्रशासन
मिरा - भाईंदर महानगरपालिका

५५

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/०१/२०१३

**प्रकरण क्र. ३० :-** **श्री. संजय दोंदे, प्रभाग अधिकारी (सध्या निलंबीत) यांना सेवेत पुर्नस्थापित करणेबाबत.**

**ठराव क्र. ३४ :-**

प्रभाग अधिकारी श्री. संजय दोंदे यांना दि. १२/०८/२०१० रोजी लाचेच्या सापळ्यामध्ये रंगेहात पकडल्यामुळे व श्री. संजय दोंदे, ४८ तासांपेक्षा जास्त कालावधीसाठी अटकेत असल्याचे पोलीस कार्यालयाकडील प्राप्त पत्राअन्वये कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था/५७२/३१/२०१०-११, दि. २३/०८/२०१० अन्वये त्यांना निलंबीत करण्यात आलेले आहे.

श्री. संजय दोंदे, यांचे निलंबन कार्यवाहीस महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७७, दि. ०१/०२/२०११ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका आधिनियम-१९४९ चे कलम ५३ (३) नुसार नियुक्ती प्राधिकरण या नात्याने निलंबनास मंजुरी देऊन निलंबन कायम केलेले आहे.

श्री. संजय दोंदे, यांना निलंबीत करुन दिर्घ कालावधी (२८ महिने) झालेला आहे. या दरम्यान त्यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेजवळ निलंबन रद्द करुन कामावर घेणेबाबत विनंती अर्ज केले आहेत. तसेच शासनाच्या नगर विकास विभाग, मुंबई, व महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोगाजवळ निलंबन रद्द करुन कामावर घेणेबाबत अर्ज केला होता. त्युनसार शासनाने दि. ०६/१०/२०१२ अन्वये श्री. संजय दोंदे, यांना पूर्नस्थापीत करणे बाबत मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी तात्काळ कार्यवाही करणेस निर्देश दिले. तसेच मा. आयुक्त, पिटासन अधिकारी, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग, यांनी त्यांचेकडील दि. ०८/११/२०१२ रोजीच्या सुनावणीत श्री. संजय दोंदे, यांच्या प्रलंबीत खटल्यातील निर्णयाचे अधिन राहुन पूर्नस्थापीत करावे.

श्री. संजय दोंदे, यांना सेवेत पूर्नस्थापीत करणे बाबत शासनाचे दि. ०६/१०/२०१२ रोजीचे पत्र व मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग, यांचेकडील दि. ०८/११/२०१२ रोजीच्या सुनावणीचे अनुषंगाने श्री. संजय दोंदे, यांची वेतनश्रेणी रु. ९३००-३४८००, ग्रेड वेतन रु. ४४०० अशी असुन सहाय्यक आयुक्त या पदाचे समकक्ष वेतनश्रेणीत त्यांचे वेतन असल्याने त्यांचे निलंबन संपुष्टात आणुन पूर्नस्थापीत करणे बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ५३ अंतर्गत तरतुदीनुसार श्री. संजय दोंदे, यांना मा. न्यायालयातील प्रलंबीत खटल्याच्या निर्णयास अधिन राहुन पूर्नस्थापीत करणेस मान्यता देण्यात येत आहे. मा. आयुक्तांनी अकार्यकारी पदावर विहित जबाबदारी सोपवून हजर करुन घ्यावे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. अशरफ शेख**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

महानगरपालिका आस्थापनेवर श्री. प्रशांत जानकर, कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग यांचेवर दि. ०९/१२/२०११ रोजी ए.सी.बी. ठाणे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार कार्यवाही केलेली आहे. त्या अनुषंगाने श्री. प्रशांत जानकर, कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग यांना जा.क्र. मनपा/आस्था/१२७१/२०११-१२, दि. २०/१२/२०११ अन्वये निलंबीत करण्यात आलेले आहे. याकामी नवघर पोलीस स्टेशन, गुन्हा रजिस्टर नंबर, ।। ११४/२०११ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१) (ड) सह १३ (२) या गुन्ह्याचे आजपावेत एकंदरीत झाले तपासात यातील आरोपी लोकसेवक श्री. प्रशांत जानकर, कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग, यांचेवर गुन्हा दाखल झालेला आहे. न्यायालयीन खटल्याच्या अधीन राहून महाराष्ट्र नागरी सेवा (निलंबन) नियम -१९८१ चे कलम (६८) (१) (ए) (एक) नुसार निलंबनानंतर कर्मचाऱ्यास ७५% उदरनिर्वाह भत्ता देत आहे. अशाप्रकारे ७५% उदरनिर्वाह भत्ता कर्मचारी कामावर न येता देण्यात येत असल्याने महानगरपालिकेस कर्मचाऱ्यांच्या कामाची आवश्यकता व निकड लक्षात घेऊन सहा. आयुक्त दर्जापेक्षा कमी दर्जाच्या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे बाबतीत निर्णय घेणेस मा. आयुक्त सो.,

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणित प्रत
३/७/१५
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

हे सक्षम प्राधिकारी असल्याने १) श्री. प्रशांत जानकर, कनिष्ठ अभियंता, २) श्री. दशरथ हंडोरे, वरिष्ठ लिपीक, व ३) श्री. गणेश गोडगे, लिपीक यांना मा. न्यायालयीन खटल्याच्या अधीन राहून अकार्यकारी पदावर रुजू करुन घेण्यास मा. आयुक्तांनी आपल्या स्तरावर कार्यावाही करावी अशी मी सुचना मांडत आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मुन्ना सिंग ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सी.एफ.सी. मे श्रीम. सिमा मिश्रा करके थी, उनको ॲडजस्ट किया गया था। तो उनको भी लिया जाए, यह मेरी सुचना है। जो भी नियम मे बैठते है उनको लिया जाए।

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका